पल्लवांकुर



# नारळ रोपांची लागवड व संगोपन

### मशागत व पूर्वतयारी -

नारळाच्या दोन झाडांमधील अंतर त्याचे विविध जातीप्रमाणे असे ठरलेले आहे.

बुटक्या जाती - ६ मी.x ६ मी. ते ७मी.x ७मी.

संकरित जाती - ७मी.x ७मी. ते ८मी.x ८मी.

बाणावली व उंच माड - ८मी.x ८मी. ते १०मी.x १० मी.

### लागवडीसाठी

प्रथम १मी. x १मी. आकाराचा खड्डा करावा. आकृतीत दाखवल्याप्रमाणे ६" ते ९" पर्यंत खत होण्याजोग्या वस्तू उदा. ओल्या फांद्या, पालापाचोळा इ. भरावा. भरण्यापूर्वी खड्ड्याचा तळ कुदळीने खणून सैल करावा. खडयातल्या मातीतील दगडगोटे काढून ठेवलेल्या मातीत ३ ते ४ टोपले शेणखत व २५० ग्रॅम लिंडेन पावडर घालून खड्डा भरून घ्यावा व पाणी द्यावे. वापसा आल्यावर १ ते २ किलो बोन मिल अथवा सुपर फॉस्फेट व २ किलो निमकेक ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅशचे मिश्रण झाडाभोवती ( मुळाच्या जागी असलेल्या फळाभोवती) घालून लागवड करावी. लागवड करतांना व त्यानंतरही वाढणाऱ्या कोंबाचा व मातीचा संबंध येणार नाही असे लावावे. आठवड्याला ८०-१०० लि. पाणी द्यावे.

### खते -

लावलेल्या झाडांना ९ ते १० महिने पुरतील इतके खात दिलेले असल्यामुळे ९ ते १० महिन्यानंतर खालीलप्रमाणे मिश्रण करावे व द्यावे. ( १० किलो शेणखत २०० ग्रॅम लिंडेन २५० ग्रॅम सुपर फॉस्फेट ३०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) बांगडा पद्धतीने द्यावे. झाडाच्या वाढीच्या प्रमाणात पाण्याची व खताची मात्रा वाढवावी)

### फवारणी व औषधी -

नारळाचे स्वास्थ्य बहुतांशी जिवाणूजन्य व बुरशीजन्य रोगामुळे धोक्यात येण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे १ ते २ महिन्याच्या अंतराने खालीलप्रमाणे फवारणी करावी.

**जिवाणूजन्य -** थायमेट व लिंडेन फवारणी

**बुरशीजन्य -** बावीसटिन व कॉपर ऑक्सिक्लोराईड झाडांच्या पानावर, खोडावर कीटकांच्या प्रादुर्भावामुळे पाने कापलेली, कुरतडलेली आढळल्यास नमुन्यासह तज्ञांचा सल्ला घ्यावा.



**सूचना -** आपल्या विभागातील ऑक्टोबर व एप्रिल मे महिन्यातील उन (तापमान) नारळास हानिकारक असल्याने या महिन्यांमध्ये रोपांच्या आजूबाजूला अच्छादन उभे करावे व बांबू, तटर अथवा झाडांच्या फांद्यांच्या सहाय्याने सावली करावी.